मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# फसव्या याकोब



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus

रूपान्तरकार: M. Kerr; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


देवाने तुमच्या कुटुंबात बाळ
कधि जन्मास दिले आहे का?
ते कित्ती रोमांचक असते!
इसहाक आणि रिबका
हे तर दुप्पट आनंदीत
असणार. कारण देव
त्यांना जुळे
देत होता.

रिबकाच्या पोटातच मुले एकमेकांशी झगडू लागली. जेंव्हा तिने प्रार्थना केली, तेंव्हा परमेश्वराने म्हटले की, तुझी दोन्ही लेकरे दोन राष्ट्रे चालवतील – आणि लहान पुत्र मोठ्यापेक्षा बलवान होईल.



सर्वसाधारणपणे
जो पहिला जन्मास
येतो तो बलवान
होतो. अखेरिस
त्या मुलांचा
जन्म झाला.



जुळे असतांनासुध्द्ा ते एकमेकांसारखे नव्हते. मोठा मुलगा एसाव, केसाळ होता त्याच्या अंगावर जास्त केस होते आणि तो एक तरबेज शिकारी झाला.



याकोब मुलायम त्वचेचा होता आणि त्याला घराच्या जवळपासच काम करायला आवडे. एसाव वडीलांचा म्हणजे इसहाकाचा आवडता होता आणि याकोब आईचा आवडता होता.



एके दिवशी, एसावाला भूक लागली होती.
एसाव याकोबाला म्हणाला, "मला जेवण दे," त्यावर याकोबाने "मला तुझा ज्येष्ठत्वाचा अधिकार विकत दे" अशी मागणी केली.



प्रथम जन्मलेल्या विषयी देवाने दिलेल्या अभिवचनाची एसावाला काहीही काळजी नव्हती. त्याने याकोबाशी ज्येष्ठत्वाचा हक्क विकण्याचा करार केला. आता त्यांच्या वडीलांच्या निधनानंतर याकोब त्या कुटुंबाचा प्रमुख बनू शकत होता.



एके रात्री परमेश्वर इसहाकाशी बोलला, "मी तुझा पिता अब्राहाम याचा देव आहे. मी तुझ्याबरोबर आहे. मी तुझ्या संततीला आशिर्वाद देईन".



इसहाक जरी जिवंत देवाची भक्ति करित होता,
तरी त्याचा मुलगा एसाव याने हित्ती लोकांपैकी दोन
बायका केल्या, ह लोक जिवंत देवाला
ओळखत नव्हते.





इसहाक आता म्हातारा झाला होता. त्याने एसावाला म्हटले, "माझ्यासाठी ताजे मृगमांस घेऊन ये. ते खाऊन मग मी तुला आशिर्वाद देईन". हा आशिर्वाद म्हणजे वडीलांकडून प्रथम पुत्राला मिळणारा त्याच्या हक्काचा आशिर्वाद होता.



एसाव त्वरेने शिकार करण्यास निघून गेला. परंतू रिबकाने त्यांचे हे बोलणे ऐकले होते. हा आशिर्वाद याकोबाला मिळावा असे तिला वाटत होते.

रिबकाने एक योजना आखली. तिने त्वरेने याकोबाच्या आवडीचे अन्न शिजविले, याकोबावर एसावचे कपडे घातले, आणि याकोबाच्या हातावर व मानेवर केसाळ प्राण्याची त्वचा लपेटली. म्हातारपणात एसावाची दृष्टी मंद झाली होती. म्हणून कदाचित ते त्याला फसवू शकत होते.



याकोबाने इसहाकासाठी भोजनाचे ताट आणले. इसहाक म्हणाला, "तुझा आवाज तर याकोबासारखा वाटतो, पण तुझे हात तर एसावासारखे आहेत." भोजन करुन झाल्यावर, इसहाकाने त्याच्या पुत्रासमोर गुडघे टेकुन त्याला आशिर्वाद दिला.





इसहाकापासून याकोब आशिर्वाद घेऊन निघून जातो ऐवढ्यात एसाव देखिल येतो. तो वडीलांना म्हणाला, "बाबा, हे घ्या तुमचे भोजन तयार आहे." इसहाकाला कळले की त्याच्याशी कपट केले गेले आहे.



त्याने दुःखाने आक्रोश करुन म्हटले, "मी आशिर्वाद बदलू शकत नाही." एसावाचे मन व्देषाने भरुन गेले. त्याने याकोबाला जिवे मारण्याचे ठरविले.

रिबकाला एसावच्या या धमकिविषयी कळले. म्हणून तिने याकोबाला म्हटले, "तु जे काही केले आहे ते तुझा भाऊ विसरेल तोपर्यंत तु तुझ्या मामाकडे जाऊन राहा."





याकोबाने त्याच्या आईच्या कुटुंबातील एखादी मुलगी त्याला बायको म्हणून पाहावी. या गोष्टीवर इसहाक राजी झाला. याप्रकारे याकोब घर सोडून निघाला.


त्या रात्री, याकोब एका
ठिकाणी थांबला व धोंडा उशीला
घेऊन झोपला. कदाचित त्याला
एकाकी वाटत असावे,
कदाचित तो घाबरला
असावा. परंतु तो
एकटा नव्हता.
अद्भुत
स्वप्नाच्याव्दारे परमेश्वर
त्याच्याशी बोलला.



"मी परमेश्वर तुझा
पिता अब्राहाम याचा
देव व इसहाकाचा देव
आहे. मी तुझ्याबरोबर आहे. मी तुला हि भूमी देईन.
तुझ्या कुटुंबाव्द्रारे पृथ्वीवरील सर्व कुटुंबे आशिर्वादित
होतील." देवाचे बोलणे झाल्यावर याकोब
जागा झाला. तो भयभीत झाला होता.


याकोबाचा मामा लाबान याने त्याचे स्वागत
केले. याकोबाला त्याच्या मामाची
मुलगी राहेल हि आवडली आणि
तिच्याशी लग्न करण्यासाठी
त्याने मामा
लाबान याची सात वर्षे सेवा
केली. परंतू, लग्नाच्या
रात्री, लाबानाने
याकोबाला फसविले.

"हि तर लेआ आहे राहेल नाही," "तू तर माझी फसवणूक केली आहे," असे म्हणत याकोबाने तक्रार केली. त्यावर लाबान म्हणाला, "आधि मोठ्या मुलिचे लग्न करणे आवश्यक असते," ...



... "तर आता राहेल संगती सुध्दा लग्न करण्यासाठी तूं अजून सात वर्षे माझी सेवा कर." याकोबाने ते मान्य केले. त्याने इसहाक व एसाव यांना फसविले होते त्याची कदाचित त्याला



आठवण झाली असावी.

याकोबाला ११ मुले होते.
पुष्कळ वर्षे निघून गेल्यावर
त्याच्या कुटूंबाला परत कनान
देशात घेऊन जाण्यास त्याला
उत्कंट ईच्छा झाली होती.



तेथे त्याचे आई–वडील होते.
परंतु तेथे ज्याने एसावाला जिवे
मारण्याचा निश्चय केला होता
तो एसाव देखिल होता.



परत जाणे सुरक्षित राहिल का? परमेश्वराने त्याला एकेदिवशी परत जाण्यास सांगितले. याकोबाने त्याचे सर्व कुटुंब आणि कळप यांना एकत्रित करुन घरि परतण्याची तयारी केली.



काय तो प्रवास होता. एसाव चारशे लोकांना सोबत घेऊन याकोबाला भेटण्यास आला ! परंतू त्याने याकोबाला इजा केली नाही.



तो पळतच याकोबाला भेटायला गेला आणि त्याने याकोबाला मोठे आलिंगन दिले. याकोब आणि एसाव पुन्हा एकदा मित्र बनले, आणि याकोब सुरक्षितपणे त्याच्या घरि परतला.



# फसव्या याकोब

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति २५–३३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे.  कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन.  तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर.  आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16